ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार १ जून, १९६६ | अंक ११



नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

ठाकरसी फॅब्रिक्स

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड ·SANFORIZED·



THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रूप

• धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.

• धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TM-56 MR

# विविध माहिती

**निसर्गोपचाराचे शिक्षणकेंद्र**—आंध्र प्रदेश सर्वोदय मंडळाने हैद्राबादजवळ निसर्गोपचाराचे शिक्षण देण्याचे एक शिबीर उघडले आहे. हे शिबीर १० दिवस चालविण्यात येणार आहे. त्याचा लाभ घेण्यासाठी डॉक्टर्स, वकील आणि काही वैद्यकीय विद्यार्थीही आले आहेत. ह्या केंद्रातर्फे १ हजार लोकांना निसर्गोपचाराचे शिक्षण देण्यात येणार आहे. डॉक्टर आणि रोग ह्यांना कसे टाळावे ह्याचे शिक्षण देण्याचा शिबिराचा हेतू आहे.

**गुजरातमध्ये सहकारी साखरकारखाना**—सुरतपासून ४० मैलांवर असलेल्या माढी ह्या ठिकाणी सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा एक साखरकारखाना उभारण्यात येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी १.७५ कोटी रुपये खर्च येणार असून रोज १,५०० टन साखर तयार करू शकणारी यंत्रसामग्री त्यात बसविण्यात येणार आहे. कारखाना रोज १,२०० ते २,००० टन ऊस गाळू शकेल. यंत्रसामग्री पश्चिम जर्मनीमधून आयात करण्यात येणार आहे.

**विद्युत्-केंद्रांसाठी मदत**—भारतामधील तीन विद्युत्-केंद्रांसाठी आणि खनिज धातूंच्या शोधासाठी मिळून ८ कोटी डॉलर्स अथवा ३८ कोटी रुपयांची मदत देण्याचे अमेरिकेने मान्य केले आहे. ही रक्कम वरील योजनांना लागणाऱ्या परदेशीय चलनाची गरज भागविण्यासाठी वापरण्यात येणार आहे. मदत अमेरिकेने तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी देण्याचे कबूल केलेले होते.

**भाताची नमुनेदार शेते**—आंतरराष्ट्रीय तांदुळ वर्षाच्या निमित्ताने भारतात भाताची नमुनेदार लागवड करणारी १ हजार राष्ट्रीय शेते स्थापन करण्यात येणार आहेत. हा उपक्रम संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेती संघटनेतर्फे करण्यात येणार आहे. प्रत्येक हेक्टर जमिनीत ७ टन तांदळाचे उत्पादन करण्यात येईल. एक हेक्टर म्हणजे २.४७ एकर असा हिशोब आहे.

**रशियाचे नवे शहर**—सैबेरिआच्या उत्तरेला याकुटिया येथे रशियाने एक छोटेसे गांव वसविण्याचे ठरविले आहे. त्याचा विस्तार अवघा ७५ एकर असेल आणि त्यातील प्रत्येक इमारत दुसरीशी व शहराच्या केंद्राशी जोडलेली असेल. दळणवळण राखण्यासाठी प्रकाशमान व उबदार मार्गांची सोय करण्यात येईल. कारण, ह्या प्रदेशात वर्षातील २७० दिवस बर्फच पडलेले असते.

**आयुर्वेद इस्पितळाची स्थापना**—गांधी आयुर्वेद विश्वविद्यालय ह्या संघटनेतर्फे अलाहाबादजवळ शुद्ध आयुर्वेदीय उपचार करणारे आणि आयुर्वेदीय संशोधन करणारे एक इस्पितळ स्थापन करण्यात येणार आहे. ह्या इस्पितळाला लाल बहादूर शास्त्री ह्यांचे नांव देण्यात येणार आहे. इस्पितळाची उभारणी करण्यासाठी १.७ लाख रुपयांची रक्कम जमविण्यात आली आहे.

**परदेशांच्या दौऱ्यासाठी चलन**—इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने भारत सरकारला अशी विनंती केली आहे की, भारताची निर्यात वाढविण्याच्या हेतूने परदेशांच्या दौऱ्यावर जाणाऱ्या उद्योगपतींना व धंदेवाइकांना परदेशीय चलन देण्याबाबतचे धोरण अधिक उदार करण्यात यावे. भारताचा परदेशीय व्यापार २ हजार कोटी रुपयांचा असताना गेल्या वर्षी दौऱ्यासाठी अवघे १.८३ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मंजूर करण्यात आले, अशी तक्रार संघटनेने केली आहे.

**सिगारेट्सवर दरमहा ४० लाखांचा खर्च**—इंपीरिअल टोबॅको कंपनीच्या एका अधिकाऱ्याने जाहीर केलेल्या माहितीप्रमाणे बृहन् मुंबईमधील सिगारेट्स ओढणारे लोक दरमहा ४० लाख रुपयांची रक्कम ह्या व्यसनावर खर्च करतात. दरमहा २० कोटी सिगारेट्सचा खप एकट्या मुंबई शहरात होतो. सिगारेट्सचा हा खप प्रचंड तर आहेच; पण, दरडोई सिगारेट्सच्या खपाचे प्रमाण मुंबईपेक्षाही हैद्राबाद शहरात अधिक आहे.

**कापडाच्या आयातीची मक्तेदारी**—सीलोनच्या घाऊक सहकारी संघटनेने सीलोनमध्ये आयात करण्यात येणाऱ्या कापडाची मक्तेदारी स्वतःकडे घेण्याचे ठरविले आहे. ही संघटना सरकारी मालकीची आहे. सध्या ही संघटना ८० टक्के कापडाची आयात करीत असते. बाकीची २० टक्के आयात खाजगी व्यापारी संघटना करीत असतात. ह्या संघटनांत हिंदी आणि पाकिस्तानी व्यापाऱ्यांचाच प्रामुख्याने समावेश आहे. कापडाच्या खाजगी आयातीत अलीकडे गैरप्रकार आढळून आले आहेत.

**विजेच्या अवजड यंत्रसामग्रीचे उत्पादन**—गेल्या आर्थिक वर्षात भोपाळ येथील अवजड विद्युत्-यंत्रसामग्री निर्माण करणाऱ्या कारखान्याने ९ कोटी रुपयांचा माल निर्माण केला. ह्या कारखान्यात १९६० साली उत्पादनास प्रारंभ करण्यात आला. तेव्हापासून कारखान्याने २४ कोटी रुपयांची विद्युत्-यंत्रसामग्री तयार केली आहे.

**खाजगी कारखाना सहकारी होणार**—गंगापूर साखरकारखाना हा खाजगी मालकीचा साखरकारखाना सहकारी विभागात जाणार आहे. ह्या कारखान्याची किंमत ठरविण्यासाठी सरकारने नेमलेल्या कमिटीने आपला अहवाल सादर केला आहे; कारखान्याच्या खरेदीसाठी जिल्हा सहकारी बँक ४५ लाख रुपये देणार असून ५ लाख रुपये ऊस पिकविणारे शेतकरी जमा करणार आहेत.

**हौशी प्रवाशांची मदत**—हौशी परदेशी प्रवाशांमुळे एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेला कशी जोराची चालना मिळते ते स्पेनच्या उदाहरणावरून दिसून येते. स्पेनमध्ये दरसाल ३.१ कोटी हौशी प्रवासी मजेने प्रवास करण्यास येतात. ही संख्या स्पेनच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक आहे. प्रवासी मोकळ्या हाताने पैसे खर्च करतात. त्यामुळे स्पेनमध्ये उद्योगधंदे फोफावले असून शेतीसाठी लागणारे मजूर दुर्लभ झाले आहेत.

**आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भाग**—येत्या ऑगस्ट महिन्याच्या अखेर दमास्कस येथे एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात येणार असून त्यात भाग घेण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. प्रदर्शनात भारत हलक्या व अवजड एंजिनिअरिंगच्या धंद्यातील माल ठेवणार आहे. हे प्रदर्शन सीरियाचे सरकार दरसाल भरवीत असते. मध्यपूर्वेतील बाजारपेठांच्या दृष्टीने ते महत्त्वाचे असते.

**हौशी प्रवाशांची सोय**—गोव्यात पणजी येथे हौशी प्रवाशांना उतरण्यासाठी एक निवासस्थान सरकारतर्फे बांधण्यात आले आहे. ह्या निवासस्थानाच्या बांधणीला १३ लाख रुपये खर्च आला आहे. त्यात सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी असून एक रेस्टॉरॉ व एक सभागृहही आहे. एका वेळी ४१ प्रवासी निवासस्थानात चांगल्या प्रकारे राहू शकतील.

# अर्थ

बुधवार, १ जून, १९६६



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांची वाढती गुप्त गंगाजळी

बँका जो नफा जाहीर करतात, त्यापेक्षा खरा नफा वेगळाच असू शकतो. करासाठी जरुरीपेक्षा जास्त तरतूद करून, गुप्त गंगाजळीकडे वर्ग करून, बँका आपला बराचसा नफा लपवीत असतात. नफा-तोटा पत्रकातील उत्पन्नाच्या बाजूत फेरफार करणे आणि बाजारभावापेक्षा, खऱ्या किंमतीपेक्षा जिंदगीची किंमत कमी लावणे, हे नित्याचे प्रकार आहेत. इमारती, जमिनी, फर्निचर, इत्यादी बिगर-बँकिंग जिंदगी ह्यावर जरुरीपेक्षा जास्त घसारा काढण्याचाही अवलंब केला जातो. उदाहरणार्थ, नव्याने बसविलेला सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ५० वर्षे टिकू शकला, तरी तो तीन-चार वर्षांतच लिहून टाकला म्हणजे ती जिंदगी पूर्णपणे 'मुक्त' होते. ह्यामुळे नफा कमी उरलेला दिसतो आणि इनकम-टॅक्स अधिकारी त्यास मान्यता देत नाहीत. तेव्हा, पूर्ण नफ्यावर कर भरून बँका त्यांच्या आक्षेपाची पूर्ती करतात; जादा काढलेल्या घसाऱ्यातून आवश्यक तेवढी रक्कम ह्या करासाठी वापरली जाते. बँकिंग जिंदगीची किंमत प्रत्यक्षापेक्षा किती कमी दाखविलेली आहे, हे कधीच कळू शकत नाही. जेथे एकसारखी किंमतवाढ होत आहे (भारतात गेली २० वर्षे तशी परिस्थिती आहे) तेथे जिंदगीची बाजारभावाने किंमत वाढत जाते, पण ताळेबंदात मात्र "पडलेली किंमत वजा घसारा" दाखविली जाते. प्रत्यक्ष मिळण्याजोगी किंमत आणि घसारा काढलेली किंमत ह्यांमधील ही तफावत बँकेला गुप्त रीतीने मजबुती आणते.

ताळेबंदातील येणे कर्जे बुडीत व संशयित येणी वजा करून दाखविण्यात येतात. ताळेबंदातून ती काढून टाकताना त्यांची पुरेशी तरतूद, हिशेबतपासनिसांच्या मान्यतेने, केली जाते. दर्शविलेल्या कर्जांची कमी केलेली रक्कम ही पुन: देणे बाजूकडील कॉन्टिन्जन्सी फंडातून तेवढीच रक्कम वजा करून हिशेब केला जातो. नफा काढण्यापूर्वी बुडीत व संशयित कर्जांची केलेली तरतूद, त्याचप्रमाणे इतर नेहमीच्या व आवश्यक तरतुदी ह्याही कॉन्टिन्जन्सी फंडाच्या द्वारा दडविल्या जातात.

चलतीच्या काळात नफ्याची रक्कम मुद्दामच कमी दाखविण्याचा प्रयत्न केला जातो; त्यामुळे अडचणीचे वेळी गुप्त गंगाजळी उपलब्ध होऊ शकते. अशा तऱ्हेची कॉन्टिन्जन्सी गंगाजळी केवढी असते, हे समजण्यास मार्ग नाही. तथापि, १९६२ अखेर १३० कोटी रु., १९६३ अखेर १५० कोटी रु. आणि १९६४ अखेर १७५ कोटी रु., असा ह्या गुप्त गंगाजळीचा आकार वाढत गेलेला असावा, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ह्या गंगाजळीतून रकमा काढून घेण्याचा सहसा प्रसंग येत नाही; पण आपल्या नोकरवर्गाला मागील काही वर्षांचा बोनस एकदम देण्याची पाळी काही बँकांवर आली, तेव्हा त्यांनी ह्या गुप्त कॉन्टिन्जन्सी गंगाजळीचा उपयोग केलेला आहे. आपत्ती, अफरातफर, चोरी, इत्यादी कारणांमुळे बँकेच्या नफ्यावर एखाद्या वर्षी फार मोठा परिणाम झाला, तर ह्या गंगाजळीतून रकमा काढून बँक आपला नफा व डिव्हिडंड कायम राखू शकते.

किंमती वाढत जातात, त्या वेळी सरकारी रोख्यांच्या किमती कमी होत जातात. हे नुकसान पुष्कळदा केवळ कागदी असते; इनव्हेस्टमेंट प्रत्यक्ष विक्रीला काढावी लागली तरच नुकसान सोसावे लागण्याचा संभव. तथापि, हिशेबाच्या काटेकोर तत्त्वाप्रमाणे आणि कायद्याप्रमाणे, अशा संभाव्य नुकसानीची तरतूद करावीच लागते. बहुधा, चालू नफ्यातून ती करता येते आणि केली जाते; पण किमतीमध्ये घट फारच मोठी झाली तर एका वर्षाच्या नफ्यातून ती भरून काढता येत नाही. अशा वेळी बँका कॉन्टिन्जन्सी फंडातील तरतुदीचा उपयोग करतात. ही नुकसानी प्रत्यक्ष आलेली नसून केवळ 'कागदी' असते आणि कॉन्टिन्जन्सी फंडाचा ती भरून काढण्यासाठी उपयोग करण्यात काही हंशील नसते. सरकारनेच अशी नुकसानी अनेक वर्षांवर विभागून तितक्या वर्षांच्या नफ्यातून तिची तरतूद करण्याची बँकांना सवलत दिली होती.

भारतातील कायदा आणि परंपरा ब्रिटिश पद्धतीची आहेत आणि इतर कंपन्यांनी जेवढी माहिती प्रकट केली पाहिजे, तेवढी प्रकट करण्याची सक्ती बँकांवर नाही. तथापि, ग्रेट ब्रिटनमध्ये बँकांना ह्याबाबत असलेल्या सवलती कमी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार बोर्ड ऑफ ट्रेडला मिळणार आहे. कारण, तेथील बँकांनी खूपच मजबुती निर्माण करून ठेवलेली आहे. हिंदी बँकांचीही हिशेबपद्धती सुधारून ती अधिक वस्तुस्थितिनिदर्शक होण्यास वाव आहे.

### टेलिफोनचे दर का वाढले ?

पोस्ट आणि तार खात्याच्या पोस्ट विभागाला दरसाल येणारे सुमारे ८ कोटी रुपयांचे नुकसान भरून काढण्यासाठी टेलिफोनचे दर वाढविण्यात आले आहेत. (१) पोस्ट कार्डे, मनिऑर्डर कमिशन, पाकिटे, रजिस्टर्ड लेटर्स, इत्यादींच्या दरांत वाढ करणे, (२) नवी पोस्ट ऑफिसे उघडण्याचे, बंद करणे किंवा (३) टेलिफोनचे दर वाढविणे, असे तीन पर्याय होते. मोठ्या फर्म्सच टेलिफोन-टेलेक्स सोईचा मुबलक उपयोग करतात, तेव्हा त्यांचे दर वाढविणेच योग्य वाटले. सरकारला वार्षिक नुकसानकारक बाबी पुढीलप्रमाणे आहेत :—पोस्टकार्डे ४४७ लक्ष रु., रजिस्टर्ड वृत्तपत्रे २३६ लक्ष रु., रजिस्टर्ड लेटर्स ७२ लक्ष रु., व्ही. पी. लेटर्स २८ लक्ष रु., रजिस्टर्ड पॅकेट्स ६९ लक्ष रु., अन्-रजिस्टर्ड पार्सले १२० लक्ष रु., व्ही. पी. पार्सले ७२ लक्ष रु., इन्शुअर्ड पार्सले १० लक्ष रु., मनिऑर्डरी २०५ लक्ष रु.

### ५४ लक्ष रेडिओ; ८ कोटी रु. उत्पन्न

बिगर-परवाना वापरात असलेले सुमारे एक लक्ष रेडिओ गेल्या वर्षी उघडकीला येऊन त्यापासून १० लक्ष रु. चा सरचार्ज वसूल करण्यात आला. १९४७ साली भारतात फक्त ३ लक्ष रेडिओ परवाने होते; १९६५ मध्ये त्यांची संख्या ५४ लक्ष लक्ष झाली, आणि त्यापासून ८ कोटी रु. चे उत्पन्न सरकारला मिळाले.

## बँकांच्या ठेवींची विमा-योजना

### गेल्या पाच वर्षांचा आढावा

डिपॉझिट विमा योजना अमलात आल्यापासून ३० सप्टेंबर, १९६५ अखेर फक्त ३८·६१ लक्ष रुपयांचे क्लेम्स प्रत्यक्ष देण्यात आले आहेत किंवा त्यांच्या देण्याची तरतूद केलेली आहे. नऊ बँकांच्या ठेवींच्या बाबतीत हे क्लेम्स आले. विमा उतरलेल्या ठेवींची रक्कम ६९०·६२ कोटी रु. आहे. १९६५ मध्ये क्लेमचे एकही देणे निर्माण झाले नाही.

१९६१ नंतर बँकिंगची प्रगती झपाट्याने होत गेली; पाच वर्षांत ठेवीच्या खात्यांची संख्या ७०·५८ लाखांची ११५·७६ झाली. पूर्णपणे संरक्षित म्हणजे १५०० रुपयांचेपेक्षा अधिक नाही. अशा ठेवींची खाती ५५·४२ लाखांवरून ८८·९८ लाखांवर गेली. एकट्या १९६५ मध्येच ह्या खात्यात अनुक्रमे १७·३८ लाख आणि १२·७१ लाख एवढी वाढ झाली. विमा उतरलेल्या ठेवीत पाच वर्षांत ७६% वाढ झाली. विम्याचा फायदा घेण्यासाठी ठेवी वेगवेगळ्या बँकांतून विभागून ठेवण्याची प्रवृत्ती आढळून आली.

ठेवीत वाढ झाली आणि खात्यांची संख्या वाढली, ती मुख्यतः मोठाल्या बँकांतून; त्यामुळे विमा उतरलेल्या ठेवीची मर्यादा १,५०० रु. ची २,००० रु. करणे कॉर्पोरेशनला शक्य व्हावे. १९६२ अखेर डिपॉझिट इन्शुअरन्स फंड ९२·८४ लक्ष रु. होता, तो १९६५ मध्ये ४६६·६३ लक्ष रु. झाला. गेल्या एका वर्षातच फंडात १४५·९६ लक्ष रु. ची वाढ झाली. १९६५ मध्ये हप्त्यांचे उत्पन्न १३५·७१ लक्ष रु. झाले. म्हणजे हप्त्यांच्या उत्पन्नापेक्षाही फंडात वाढ जास्त रकमेची झाली! कॉर्पोरेशनच्या गुंतवणुकीवरील उत्पन्नाचा काही अंश चालू व्यवस्था खर्चाला पुरेसा झाला. ठेवींच्या विम्याची योजना शुभकाली झालेली दिसते.

---

## कुटुंबनियोजनाची पद्धतशीर मोहीम

पंजाबमधील अंबाला जिल्ह्यात कुटुंबनियोजनाच्या प्रचाराची पद्धतशीर मोहीम चालू करण्यात आली आहे. ह्या मोहिमेला अमेरिकेतील फोर्ड फौंडेशनतर्फे मदत देण्यात येत असून रेडिओ आणि सिनेमा ह्यांचा भरपूर उपयोगही करण्यात येत आहे. जिल्ह्यातील खेड्यांतून ५ हजार रेडिओ आणि शहरी विभागांतून ४५ हजार रेडिओ कुटुंबनियोजनाच्या प्रचाराचे काम करणार आहेत. त्याशिवाय कुटुंबनियोजनाविषयी चित्रपटद्वारे माहिती पुरविणाऱ्या मोटारी ग्रामीण भागांतून फिरविण्यात येणार आहेत. ह्या मोहिमेत रोज २० हजार लोकांना माहिती पुरविण्यात यावयाची आहे. मोहीम ४० दिवस चालविण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारा नोकरवर्ग, प्राथमिक आरोग्यकेंद्रे आणि शहरातील आरोग्यसाधक संस्था ह्यांच्यामार्फत पुरविण्यात येणार आहे. पंजाबात संततिनियमनाच्या मोहिमेला चांगली साथ मिळत आहे.

---

## इं. ए. कॉर्पोरेशन आणि एअर इंडिया ह्यांचा अपेक्षित नफा

इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनला १९६६–६७ मध्ये १·३४ कोटी रुपये नफा होईल, अशी त्याच्या अंदाजपत्रकात अपेक्षा करण्यात आली आहे. एकूण उत्पन्न २८·५४ कोटी रुपये होऊन २७·२० कोटी रुपये खर्च होईल. एअर इंडियाचे उत्पन्न ३२·२१ कोटी रु. होऊन खर्च ३१·८९ कोटी रु. होईल आणि नफा ३२ लक्ष रु. उरेल, असा अंदाज आहे.

## तांबडा जोंधळा घेणे अपरिहार्य

अमेरिकेकडून भारताला मिळावयाच्या अन्नधान्याबाबत आणखी एक पी. एल. ४८० करार करण्यात यावयाचा आहे. ह्यासंबंधीची घोषणा अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी केली असून संबंधित करारावर लवकरच सह्या करण्यात येणार आहेत. कराराप्रमाणे मिळावयाच्या धान्यापैकी ७ लाख, ५० हजार टन तांबडा जोंधळा अथवा मिलो घेण्याची तयारी भारताने दाखविली आहे. हा जोंधळा भारतात खपत नसल्याने तो घेण्याची सक्ती करण्यात येऊ नये असा आग्रह भारताने अमेरिकेकडे धरला होता. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. भारतामधील अन्नधान्याची परिस्थिती येत्या चार महिन्यांत अधिकच बिकट होत जाण्याची लक्षणे दिसत आहेत. ओरिसातील दुष्काळाने तर उग्र स्वरूप धारण केलेले आहे. दुष्काळग्रस्त भागांतून तांबडा जोंधळा मोफत अन्नकेंद्रांमधून पुरविला जाण्याची शक्यता आहे. इतर भागातही स्वस्त धान्याच्या दुकानांतून गव्हाबरोबर मिलो पुरविणे हळूहळू भाग पडणार आहे. गव्हाबरोबर मिलो घेण्याची सूचना अमेरिकेनेच केलेली होती. अमेरिकेजवळ असलेला शिलकी गव्हाचा साठा संपत आल्यामुळे मिलो घेण्याची सूचना अमेरिकेला करावी लागली असे सांगण्यात येते. भारताची सर्वच गरज गव्हाने भागवावयाची म्हटले तर अमेरिकेला आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राखून ठेवलेल्या गव्हाच्या साठ्यातून उपसा करावा लागणार होता. ही गोष्ट करण्यास अमेरिका अर्थातच नाखूष होती. भारताला पाठवावयाच्या अन्नधान्याच्या वाहतुकीच्या कार्यक्रमास अनुसरून आता गव्हाच्या मर्यादित खरेदीस पुन्हा प्रारंभ करण्यात येईल.

---

## सरकारच्या औद्योगिक धोरणाचे समर्थन

मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनी राजकोट येथे औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या एका केंद्राचे उद्घाटन करताना सरकारच्या औद्योगिक धोरणाचे समर्थन केले आहे. ह्या प्रसंगी भाषण करताना ते म्हणाले की, पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनी १९४८ साली देशाच्या आर्थिक व औद्योगिक धोरणाची दिशा ठरवून दिलेली आहे. ह्या धोरणाप्रमाणे तांत्रिक बाबतीत परदेशांचे सहकार्य घेण्याचे आणि भागभांडवलात हिंदी भांडवलाचा वरचष्मा ठेवून परदेशांचे औद्योगिक सहकार्य घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. फक्त काही अपवादात्मक बाबींत परदेशीय सहकार्य मिळणे सुलभ व्हावे, म्हणून परदेशीय भांडवलाला थोडे झुकते माप देण्याची मुभा ठेवण्यात आलेली आहे. तथापि, असे अपवाद करतानासुद्धा आधुनिक उत्पादनतंत्रात देशाची प्रगती व्हावी हीच दृष्टी ठेवण्यात आलेली आहे. परदेशांची मदत घेण्याचे सरकारी धोरण पूर्णपणे योग्य आहे. त्यात देशाची विक्री करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय, भारत परदेशांकडून जी मदत घेतो ती काही धर्मादाय घेत नाही. आर्थिक देवाण-घेवाणीचा एक भाग, असे ह्या मदतीचे स्वरूप आहे. व्यापार आणि आर्थिक सहकार्य ह्यांच्या चौकटीतच ही मदत घेतली जाते. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आणि औद्योगिक वाढ झपाट्याने साधण्यासाठी परदेशांच्या मदतीची भारताला अतिशय गरज आहे. १९४८ साली आखण्यात आलेल्या औद्योगिक धोरणात बसेल अशीच मदत स्वीकारण्यात येत आहे. त्या धोरणापासून विचलित होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय, भारतात गुंतवल्या जाणाऱ्या भांडवलाच्या मानाने परदेशीय भांडवलाची गुंतवणूक अल्प म्हणजे सुमारे ५ टक्के इतकीच आहे.

सहकारी चळवळीचे एक अध्वर्यू

# राहुरीचे लोकप्रिय आमदार बाबूरावजी तनपुरे



राहुरीचे लोकप्रिय आमदार बाबूरावजी उर्फ दादासाहेब तनपुरे माहीत नाही अशी व्यक्ती पश्चिम महाराष्ट्रात मिळणे कठीण आहे. सहकारी चळवळीतील स्पृहणीय कार्यामुळे व त्यातल्यात्यात कृषी औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या राहुरी सहकारी साखर कारखान्याच्या दैदीप्यमान यशामुळे त्यांचे नाव सर्वपरिचित झाले आहे.

जन्म राहुरी येथील गरीब घरंदाज शेतकरी कुटुंबात १९१४ साली झाला. थोरला मुलगा म्हणून वडिलांच्या शेती व्यवसायात मदत करणे क्रमप्राप्त ठरल्याने त्यांना त्यांचे इंग्रजी शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागले. दादासाहेबांचे वडील कै. लक्ष्मणराव अप्पाजी तनपुरे हे शिस्तीचे भोक्ते होते त्यामुळे मुलांना फारच चांगले वळण लागले.

घरचे वातावरणही अतिशय समाधानी व प्रसन्न असे आहे. त्यांना सहा मुले व तीन मुली आहेत. आपल्याला शिक्षणाचा लाभ घेता आला नाही त्यामुळे त्यांनी मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यांचे थोरले चिरंजीव श्री. बापूसाहेब हे बी. एससी. असून नंबर दोनचे श्री. रावसाहेब हे एलएल. बी. च्या दुसऱ्या वर्षात आहेत. दोन कॉलेजमध्ये व दोन हायस्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत.

सार्वजनिक कार्यामुळे शेतीचा बराच भार त्यांच्या सच्छील व सुस्वभावी गृहलक्ष्मी सौ. भागीरथीबाई व धाकटे बंधू श्री. दगडूराम लक्ष्मण तनपुरे हे सांभाळतात. नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय ऊसस्पर्धेत या दोघांनाही बक्षिसे मिळाली आहेत.

शेती हा मूळचा व्यवसाय वडिलांच्या बरोबरीने सांभाळीत असताना देशप्रेमाच्या व देशबांधवांच्या दुःखाच्या जाणीवेने ते १९३६ पासून काँग्रेसचे कार्यात भाग घेऊ लागले व सार्वजनिक कार्याकडेही लक्ष देऊ लागले. त्यांच्या गावातील सार्वजनिक कार्यामुळे ते १९४२ साली राहुरी ग्रामपंचायतीचे सरपंच झाले. त्याच वेळी महात्मा गांधींनी पुकारलेल्या चलेजावच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना सहा महिने कारावासाची शिक्षा झाली. दादासाहेबांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढत गेली. त्यामुळे त्या भागातील जनतेने त्यांना लोकल बोर्डात काम करण्याची संधी १९४२ ते १९४६ चे काळात दिली.

त्यांनी स्वानुभवावरच हेरले की, उत्तम बागायती शेतीसाठी पुरेसे व वेळेवर भांडवल मिळणे आवश्यक आहे. त्या वेळच्या सहकारी क्रेडिट संस्था इतक्याशा कार्यक्षम नसल्याने भांडवल मिळत नसे. त्यासाठी त्यांनी राहुरीची विविध कार्यकारी सोसायटी कार्यक्षम केली. हीच त्यांच्या सहकार्यातील कामगिरीची सुरुवात म्हणावी लागेल. त्यांनी राहुरी तालुका फ्रूट ग्रोअर्स सोसायटी काढून बागाईत शेतकऱ्यांना योग्य प्रकारे पुरेसा भांडवलपुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून दिली.

सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केलेला ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट ॲक्ट राहुरी तालुक्यास लागू केला व त्याच्या अंमलबजावणीसाठी मार्केट कमिटीची स्थापना १९५० साली केली. सदर कमिटीचे चेअरमन म्हणून दादासाहेबांनी एक तप काम पाहून कमिटी नावारूपास आणली.

दादासाहेबांचा व्यापारामुळे कोपरगांव तालुक्याशी बराच संबंध आला. त्यांच्या गोड व मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांना मोठा मित्रपरिवार लाभला. त्यामुळे प्रवरा सहकारी साखरकारखान्याचे धर्तीवर कोपरगाव येथे निघत असलेल्या कोपरगाव सहकारी साखरकारखान्याचे ते संचालक निवडले गेले.

त्यांचे नजरेसमोर प्रवरा सहकारी साखरकारखान्यामुळे होत असलेली शेतकऱ्यांची उन्नती व कोपरगांव सहकारी साखरकारखान्यासाठी केलेले प्रयत्न त्यामुळे आपल्या भागांतही सहकारी तत्त्वावर साखरकारखाना काढण्याचे त्यांनी योजिले व ही कल्पना आपल्या सहकाऱ्यांजवळ बोलून दाखविल्याबरोबर दादासाहेबांच्या कार्यक्षमतेविषयी खात्री व जनतेचा त्यांच्यावरील दृढ विश्वास त्यामुळे ती फलद्रूप होऊन ३–११–५४ रोजी त्यांनी राहुरी सहकारी साखरकारखाना या संस्थेची मुहूर्तमेढ रोविली.

कारखाना रजिस्ट्रेशनसाठी व नंतरच्या उभारणीसाठी लागणारे भाग भांडवल शेतकऱ्यांस पुरेसे उपलब्ध नव्हते. परंतु दादासाहेबांनी कारखान्यामुळे येणाऱ्या उज्ज्वल भविष्यकाळाचे चित्र योग्य तऱ्हेने जनतेपुढे रेखाटल्यामुळे, अतिशय अडचणीची परिस्थिती असताना लोकांनी डागदागिने मोडून, शेळ्यामेंढ्या विकून भांडवलउभारणीचे कामी त्यांचेशी सहकार्य केले व अडचणीच्या परिस्थितीवर मात करून कारखाना नावारूपास आणला. दादासाहेबांच्या कुशल नेतृत्वामुळे व जनतेचा त्यांच्यावरील विश्वासामुळे हे साध्य झाले.

दादासाहेब म्हणजे राहुरी सहकारी साखरकारखाना असे आज समीकरण झाले आहे. १९५६–५७ साली प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात करून प्रतिवर्षी एक एक यशाचे पाऊल पुढे टाकीत ही संस्था प्रगती करीत आहे. कारखान्यामुळे तालुक्यातील जनतेस उसाच्या पिकापासून निश्चित उत्पन्न मिळण्याची शाश्वती झाली.

त्यामुळे दिवसेंदिवस उसाखालील क्षेत्र वाढत जाऊन आज ३ लाख टनांवर ऊस कार्यक्षेत्रात उपलब्ध झाला आहे. शेवटी गाळप शक्ती कमी पडू लागल्याने सुमारे लाखभर टन ऊस दुसऱ्या कारखान्याकडे पाठविणे भाग पडले.

बाहेर ऊस देण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेने गाळप शक्तीची मर्यादा वाढविण्याचे ठरविले असून, पुढील हंगामात प्रतिदिनी १५०० टन ऊस गाळला जाईल अशा तऱ्हेने कारखान्याचे वाढीची योजना जोरात कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यासाठी लागणारे भांडवल आज असलेल्या सभासदांतूनच उभारण्याचा अभिनव प्रयोग केला आहे आणि तो यशस्वी होत आहे.

तसेच त्यांनी ठरले की कृषी औद्योगिक विकास करावयाचा असेल तर एका स्थिरावलेल्या धंद्यातून शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक तदनुषंगिक धंदे सहकारी तत्त्वावर काढले पाहिजेत. त्यासाठी ते अहोरात्र कष्ट घेत आहेत.

याचेच दृश्य स्वरूप म्हणजे शेतकऱ्यांनी चालविलेली सहकारी तत्त्वावरील जिनिंग व प्रेसिंग सोसायटी होय. त्या संस्थेस आता २,५०० चात्यांचे स्पिनिंगचे लायसन्सही मिळाले असून लवकरच त्याचे उभारणीस सुरुवात होणार आहे. वीव्हिंग मिल्सचेही उद्दिष्ट नजरेसमोर ठेवले आहे.

ऑईल केकचा कारखाना, सुपर फॉस्फेटचा कारखाना, मिश्र खताचा कारखाना, सर्जिकल कॉटन निर्मितीचा कारखाना, तसेच मळीपासून अल्कोहोल आदी पदार्थ निर्माण करणे, बगॅसपासून कागद इत्यादी कारखाने सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांनी उभारावेत म्हणून दादासाहेब त्याचे महत्त्व शेतकऱ्यांवर बिंबवीत आहेत. त्यांची स्वप्ने साकार होतील अशी लोकांनाही खात्री वाटत आहे.

कित्येक वेळा मोठ्या योजना पार पाडणे एखाद्या सहकारी संस्थेस शक्य होत नाही, ते शक्य व्हावे म्हणून दादासाहेबांनी जिल्ह्यातील सहकारी साखरकारखाना औद्योगिक संघ स्थापन केला असून त्याचे दादासाहेब मुख्य प्रवर्तक आहेत. त्या संस्थेमार्फत ३०० टनी कागद कारखाना उभारणीची प्राथमिक तयारी जोरात चालू आहे.

अशा तऱ्हेने त्यांनी आता आपले सर्व कार्य सहकारी क्षेत्रात करण्याचे कंकण बांधले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्यांच्या कार्यामुळे गेल्या वर्षापासून महाराष्ट्रातील सहकारी साखरकारखाना संघावर चेअरमन म्हणून निवड झाली.

दादासाहेबांचे सहकारातील कार्य पाहता त्यांना सहकारी चळवळीचे एक अध्वर्यू मानणे गैर होणार नाही.

### ब्रिटनमधील खलाशांच्या संपाचे परिणाम

ब्रिटनमधील खलाशांनी सुरू केलेला संप ही ब्रिटनच्या गेल्या कित्येक वर्षातील औद्योगिक घडामोडीतील गंभीर स्वरूपाची घटना आहे. ह्या संपाचे परिणाम ब्रिटनमधील जीवनावर घडून येण्यास काळ लोटावा लागेल. सुमारे ६५ हजार खलाशी संपात सामील झालेले असले, तरी त्यांतील जवळ जवळ निम्मेजण आपआपल्या सागरी सफरीवर गेलेले आहेत. ज्या सफरीवर ते कंत्राटी कामावर आहेत, त्या सफरी पुऱ्या होऊन ते मायदेशी आल्यावर नवीन करार करण्याचे त्यांनी नाकबूल केल्यास संपाचा खरा जोर समजून येईल. ह्याचाच अर्थ असा, की संपाचे परिणाम दिसून येण्यास कालावधी लागणार आहे. सध्या तरी ब्रिटनमध्ये अन्नाचा अगर कच्च्या मालाचा तुटवडा भासत नाही. तथापि, संप प्रकरणाला आणखी एक बाजू आहे. संपाचा काल जसजसा वाढत जाईल तसतशी ब्रिटनच्या बंदरात पडून राहिलेल्या बोटींची संख्या वाढू लागेल आणि परदेशी बोटींना ब्रिटिश बंदरांत मालाची चढ-उतार करणे अशक्य होऊ लागेल. ब्रिटनच्या सागरी व्यापारापैकी अर्धाअधिक व्यापार परदेशी बोटींच्या मार्फत होत असतो. पश्चिम युरोपात ब्रिटनच्या खलाशांना मिळणारे वेतन हे सर्वात कमी आहे. अर्थातच वेतनवाढीची त्यांची मागणी चांगली सबळ आहे. खलाशांची संघटना आतापर्यंत तरी फारशी मजबूत अशी झालेली नाही. गेल्या ५० वर्षांत त्यांनी अधिकृत असा संप केलेला नाही. त्यांच्या मागण्या ४० तासांचा कामाचा आठवडा, व जादा कामाबद्दल जादा वेतन अशा आहेत. त्या मान्य करण्यात आल्या तर त्यांच्या वेतनात तावडतोब १७ टक्के वाढ करावी लागेल. बोट कंपन्या मात्र १३ टक्के वाढ देण्यापलीकडे अधिक काही करण्यास तयार नाहीत आणि ही वाढही तीन वर्षांत हळूहळू देण्यात येणार आहे. संप दीर्घ काळ चालला तर ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा वाईट परिणाम होईल.

### रांची येथील भारी एंजिनिअरिंगचा कारखाना

रांची येथील भारी एंजिनिअरिंग कारखान्याचा १९६४–६५ चा वार्षिक अहवाल मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. संजीवय्या ह्यांनी लोकसभेला सादर केला आहे. ह्या कारखान्याचे तीन विभाग असून त्या सर्वांना भरपूर काम उपलब्ध होणार आहे. दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यासाठी लागणारी अवजड यंत्रसामग्री आणि बोकेरो येथे उभारण्यात येत असलेल्या ४ थ्या पोलादाच्या कारखान्याची बरीचशी यंत्रसामग्री रांची येथील कारखान्यात तयार करण्यात येणार आहे. अहवालाच्या वर्षी ह्या कारखान्याने एकूण २०१ कोटी रुपयांचा माल तयार केला. त्यापैकी ९५.५० लाख रुपये किंमतीची यंत्रसामग्री कारखान्याच्या विस्ताराच्या कामासाठी वापरण्यात आली. ह्या वर्षी कारखान्याकडे नोंदविण्यात आलेल्या मागण्या काहीशा रोडावल्या होत्या. त्यामुळे थोडेसे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु आता परिस्थिती पालटलेली आहे. रांची येथील कारखान्याच्या सहकार्याने बिहार सरकार एका औद्योगिक वसाहतीची उभारणी करण्याच्या कामास लागले आहे. ह्या औद्योगिक वसाहतीत दुय्यम व छोट्या उद्योगधंद्यांचे १०० घटक उभारण्यात येणार आहेत. त्यांचा उपयोग मुख्यत: रांचीच्या कारखान्यालाच होईल. कारखान्याला लागणारे यंत्रसामग्रीचे सुटे भाग, हत्यारे, इत्यादी वस्तू ह्या छोट्या घटकांमधून तयार करण्यात येणार आहेत. अहवालाच्या वर्षी कारखान्याच्या भांडवलात ३.३५ कोटी रुपयांची भर घालण्यात आली. हे भांडवल सर्वच्या सर्व ऑर्डिनरी भागांचे आहे. कॉर्पोरेशनला ३४.६५ कोटी रुपयांची कर्जे देण्यात आली. ३१ मार्च १९६५ अखेरपर्यंत कारखान्याचे विकले गेलेले आणि वसूल भांडवल ८५ कोटी रुपयांचे होते. त्याच मुदतीपर्यंत मध्यवर्ती सरकारकडून घेतलेल्या कर्जाची एकूण रक्कम ४४.६५ कोटी रुपयांच्या घरात गेलेली होती.

### टेलिफोनच्या यंत्रसाहित्याची निर्यात

चालू वर्षी भारतात तयार झालेली टेलिफोनची यंत्रसामग्री अधिक प्रमाणात निर्यात करण्यात येणार असून काही नव्या बाजारपेठांत भारत प्रथमच पदार्पण करणार आहे. गेल्या वर्षी बंगलोर येथील टेलिफोनचे साहित्य तयार करणाऱ्या कारखान्याने ७.४० लाख रुपये किंमतीच्या यंत्रसाहित्याची निर्यात केली होती. ह्या वर्षी निर्यात मालाच्या किंमतीचा आकडा १२ लाख रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. ब्राझिल ह्या देशाकडून कंपनीकडे १४ लक्ष रुपये किंमतीच्या साहित्याची मागणी नोंदविण्यात आली असून पूर्व युरोपमधील काही देशांशी बोलणी चालू आहेत. भारताकडून टेलिफोनचे यंत्रसाहित्य आयात करणाऱ्या देशांत, नेपाळ, भूतान, मलेशिया, सुदान, सीलोन, ब्रम्हदेश, कुवाइत, इराक, इत्यादी देशांचा समावेश आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात २ लाख टेलिफोन्स व इतर साहित्य निर्माण करण्यात यावयाचे आहे.

### परदेशीय कंपन्यांत अधिक हिंदी अधिकारी


परदेशांच्या मालकीच्या अगर त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या कंपन्यांतून वरिष्ठ जागांवर काम करणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांची संख्या वाढत चाललेली आहे. मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांतही आता हिंदी अधिकारी पूर्वीच्या मानाने अधिक प्रमाणात आढळून येतात. गेल्या मे महिन्यात भारत सरकारने परदेशी कंपन्यांना एक नोटीस पाठवून त्यांत काम करणाऱ्या हिंदी व बिगर हिंदी अधिकाऱ्यांची माहिती मागविली होती. कंपन्यांनी पाठविलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, १ जानेवारी, १९६५ रोजी ह्या संघटनांतून वरिष्ठ प्रतीच्या जागांवर काम करणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांची संख्या १६,३०२ होती. त्यापूर्वी म्हणजे १ जानेवारी, १९६४ रोजी ही संख्या १३,८२४ होती. त्याचबरोबर कामावर असलेल्या बिगर-हिंदी नोकरांची संख्या ३,१३५ वरून ३,०१४ पर्यंत खाली घसरलेली आढळून आली. टक्केवारीच्या भाषेत वरिष्ठ प्रतीच्या जागांवर काम करणाऱ्या हिंदी नोकरांची टक्केवारी ८१·५ टक्क्यांवरून ८४·४ टक्क्यांपर्यंत वाढलेली आढळून आली. प्राप्तीवरील करातून माफी असलेल्या आणि अल्प मुदतीच्या कराराने काम करणाऱ्या परदेशी तंत्रज्ञांची संख्या १ जानेवारी, १९६४ रोजी ४२१ होती ती १ जानेवारी, १९६५ रोजी ४७७ पर्यंत वाढलेली आढळून आली. परदेशी व हिंदी कंपन्या ह्यांतून काम करणाऱ्या बिगर-हिंदी नोकरांची एकूण संख्या ५,०३६ इतकी आहे. ह्या संख्येत सरकारी औद्योगिक संघटनेत काम करणाऱ्या परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. ह्या सर्वांचे मासिक पगार १ हजार रुपये अगर त्यापेक्षा अधिक होते. त्यांपैकी ३,६७८ नोकर कायम स्वरुपाच्या जागांवर काम करीत होते आणि १,३५८ लोक हंगामी स्वरूपाच्या तंत्रज्ञांच्या जागांवर काम करीत होते. पहिल्या गटातील ८२ टक्के नोकर आणि दुसऱ्या गटातील ३५ टक्के नोकर परदेशी कंपन्यांत काम करीत होते.

### महाराष्ट्रात रेडिओ असणाऱ्यांची संख्या अधिक

१९६५ साली रेडिओसाठी देण्यात आलेल्या परवान्यांच्या संख्येवरून असे दिसून आले की, महाराष्ट्रात रेडिओ बाळगणारांची संख्या इतर राज्यांच्या मानाने अधिक आहे. सर्व भारतात मिळून ५४,०४,४७३ रेडिओचे परवाने देण्यात आले. त्यांपैकी ८,२६,६६७ परवाने महाराष्ट्रात देण्यात आले. त्यानंतर बंगालचा व त्यानंतर मद्रासचा अनुक्रम लागतो. बंगाल राज्यात ७,३९,९०२ व मद्रास राज्यात ५,९८,११४ परवाने देण्यात आले. प्रत्येक ५० रेडिओंमागे एक तरी रेडिओ विनापरवाना वापरण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. अशा रेडिओंची संख्या १,०२,७७२ इतकी असल्याचे तपासात दिसून आले. परंतु तपासणीत न सापडलेले असे आणखी बरेच चोरटे रेडिओ असावेत असा अंदाज आहे. अशा चोरट्या रेडिओंची संख्या पंजाबात सर्वांत अधिक म्हणजे १६,८३७ इतकी आढळून आली. रेडिओ परवान्यांच्या फीच्या रूपाने ८ कोटी रुपये गोळा झाले.

### काँगोमधील शहरांना नवी नावे

काँगोमधील कित्येक महत्त्वाच्या शहरांना १ जुलै रोजी नवी नावे देण्यात येतील. काँगोची राजधानी लिओपोल्डव्हील, त्याचप्रमाणे एलिझाबेथव्हील आणि स्टॅन्लेव्हील ह्यांना नवी नावे मिळतील. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सहाव्या वाढदिवसानंतर म्हणजे १ जुलै रोजी हे नामांतर होईल.

महाराष्ट्र शासनाच्या अल्पबचत संचालनालयाद्वारे प्रकाशित.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११·९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६·०८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४३८·०२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४९०·७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

### परदेशीय कंपन्यांत अधिक हिंदी अधिकारी


परदेशांच्या मालकीच्या अगर त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या कंपन्यांतून वरिष्ठ जागांवर काम करणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांची संख्या वाढत चाललेली आहे. मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांतही आता हिंदी अधिकारी पूर्वीच्या मानाने अधिक प्रमाणात आढळून येतात. गेल्या मे महिन्यात भारत सरकारने परदेशी कंपन्यांना एक नोटीस पाठवून त्यांत काम करणाऱ्या हिंदी व बिगर हिंदी अधिकाऱ्यांची माहिती मागविली होती. कंपन्यांनी पाठविलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, १ जानेवारी, १९६५ रोजी ह्या संघटनांतून वरिष्ठ प्रतीच्या जागांवर काम करणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांची संख्या १६,३०२ होती. त्यापूर्वी म्हणजे १ जानेवारी, १९६४ रोजी ही संख्या १३,८२४ होती. त्याचबरोबर कामावर असलेल्या बिगर-हिंदी नोकरांची संख्या ३,१३५ वरून ३,०१४ पर्यंत खाली घसरलेली आढळून आली. टक्केवारीच्या भाषेत वरिष्ठ प्रतीच्या जागांवर काम करणाऱ्या हिंदी नोकरांची टक्केवारी ८१·५ टक्क्यांवरून ८४·४ टक्क्यांपर्यंत वाढलेली आढळून आली. प्राप्तीवरील करातून माफी असलेल्या आणि अल्प मुदतीच्या कराराने काम करणाऱ्या परदेशी तंत्रज्ञांची संख्या १ जानेवारी, १९६४ रोजी ४२१ होती ती १ जानेवारी, १९६५ रोजी ४७७ पर्यंत वाढलेली आढळून आली. परदेशी व हिंदी कंपन्या ह्यांतून काम करणाऱ्या बिगर-हिंदी नोकरांची एकूण संख्या ५,०३६ इतकी आहे. ह्या संख्येत सरकारी औद्योगिक संघटनेत काम करणाऱ्या परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. ह्या सर्वांचे मासिक पगार १ हजार रुपये अगर त्यापेक्षा अधिक होते. त्यांपैकी ३,६७८ नोकर कायम स्वरूपाच्या जागांवर काम करीत होते आणि १,३५८ लोक हंगामी स्वरूपाच्या तंत्रज्ञांच्या जागांवर काम करीत होते. पहिल्या गटातील ८२ टक्के नोकर आणि दुसऱ्या गटातील ३५ टक्के नोकर परदेशी कंपन्यांत काम करीत होते.

### महाराष्ट्रात रेडिओ असणाऱ्यांची संख्या अधिक

१९६५ साली रेडिओसाठी देण्यात आलेल्या परवान्यांच्या संख्येवरून असे दिसून आले की, महाराष्ट्रात रेडिओ बाळगणारांची संख्या इतर राज्यांच्या मानाने अधिक आहे. सर्व भारतात मिळून ५४,०४,४७३ रेडिओचे परवाने देण्यात आले. त्यांपैकी ८,२६,६६७ परवाने महाराष्ट्रात देण्यात आले. त्यानंतर बंगालचा व त्यानंतर मद्रासचा अनुक्रम लागतो. बंगाल राज्यात ७,३९,९०२ व मद्रास राज्यात ५,९८,११४ परवाने देण्यात आले. प्रत्येक ५० रेडिओंमागे एक तरी रेडिओ विनापरवाना वापरण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. अशा रेडिओंची संख्या १,०२,७७२ इतकी असल्याचे तपासात दिसून आले. परंतु तपासणीत न सापडलेले असे आणखी बरेच चोरटे रेडिओ असावेत असा अंदाज आहे. अशा चोरट्या रेडिओंची संख्या पंजाबात सर्वांत अधिक म्हणजे १६,८३७ इतकी आढळून आली. रेडिओ परवान्यांच्या फीच्या रूपाने ८ कोटी रुपये गोळा झाले.

### कॉंगोमधील शहरांना नवी नावे

कॉंगोमधील कित्येक महत्त्वाच्या शहरांना १ जुलै रोजी नवी नावे देण्यात येतील. कॉंगोची राजधानी लिओपोल्डव्हील, त्याचप्रमाणे एलिझाबेथव्हील आणि स्टॅन्लेव्हील ह्यांना नवी नावे मिळतील. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सहाव्या वाढदिवसानंतर म्हणजे १ जुलै रोजी हे नामांतर होईल.

महाराष्ट्र शासनाच्या अल्पबचत संचालनालयाद्वारे प्रकाशित.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११·९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६·०८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४३८·०२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४९०·७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

## बँकांकडील ठेवी आणि त्यावरील व्याज

### जास्त व्याजाच्या दीर्घ मुदतीच्या ठेवीत वाढ

( आकडे लक्ष रुपयांचे )

| दर | जून १९६४ | | डिसें. १९६४ | | जून १९६५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % |
| १. ० | ५३५,१८ | २८.८ | ५५८,५३ | २८.१ | ५९४,९१ | २७.७ |
| २. ० ते ४ | ८३८,१६ | ४५.१ | ६११,२५ | ३०.७ | ८८,०८ | ४.१ |
| ३. ४ | २९६,२७ | १५.९ | ४१९.९३ | २१.१ | ५५१,०२ | २५.६ |
| ४. ४ ते ५ ( ५ सकट ) | १७८,४९ | ९.६ | ३५१.६८ | १७.७ | ५११,५२ | २३.८ |
| ५. ५ ते ६ ( ६ धरून ) | ९,४३ | ०.५ | ४४,३५ | २.२ | ३१७,१५ | १४.७ |
| ६. ६ चे वर | १,३३ | ०.१ | ४,२२ | ०.२ | ८९,१० | ४.१ |
| एकूण | १८५८,८६ | १००.० | १९८९,९६ | १००.० | २१५१,७८ | १००.० |

## शेड्यूल्ड बँकांची उद्देशानुसार कर्जे

( आकडे कोटी रुपयांचे )

| उद्देश | मार्च ३१, १९६३ — ७७ बँका | | | मार्च ३१, १९६४ — ७५ बँका | | | मार्च ३१, १९६५ — ७५ बँका | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | रक्कम | % | खात्यांची संख्या | रक्कम | % | खात्यांची संख्या | रक्कम | % |
| कारखानदारी ... | ४३,८८० | ९२१.२४ | ५७.२ | ५३,८५९ | ११०४.४० | ५९.२ | ४८,३२८ | १२८७.३२ | ६१.५ |
| व्यापार ... | १,७५,४८९ | ४४३.९५ | २७.६ | १,९७,३६६ | ४८६.८३ | २६.१ | १,७४,१२४ | ५३६.७८ | २५.६ |
| आर्थिक संस्था ... | १८,२२५ | ८४.०८ | ५.२ | १६,३६५ | ९९.१९ | ५.३ | १५,३४० | ९४.२३ | ४.५ |
| शेती ... | ५०,१९४ | ४.०९ | ०.३ | १,२०,८७० | ८.६९ | ०.४ | ५७,८०८ | ३.९५ | ०.२ |
| व्यक्तिगत ... | ६,३३,८३० | ९९.२२ | ६.१ | ५,९५,७४२ | १०१.७७ | ५.५ | ७,२८,२०६ | १०९.२२ | ५.२ |
| व्यावसायिक ... | ४८,९९६ | १२.४६ | ०.८ | १७,९१९ | १२.२३ | ०.७ | १८,६५३ | १३.१९ | ०.६ |
| इतर सर्व ... | ५८,२२७ | ४५.६६ | २.८ | ५१,४०८ | ५१.३५ | २.८ | ८३,९३८ | ५०.०५ | २.४ |
| एकूण ... | १०,२८,८४१ | १६१०.७० | १००.० | १०,५३,५२९ | १८६४.७५ | १००.० | ११,२६,३९७ | २०९४.०५ | १००.०० |

## शेड्यूल्ड बँकांचा कर्जपुरवठा

### औद्योगिक उत्पादन-वाढीच्या मानाने कर्जवाढ जास्त; कर्जे वाढली, पण कर्जदार कमी झाले

शेड्यूल्ड बँकांच्या कर्जीत औद्योगिक कर्जांची वाढ होत आहे. ती कर्जे १७% ने वाढून १२८७ कोटी रु. वर गेली. एकूण कर्जांतील त्यांचे प्रमाणही ५९.२% चे ६१.३% झाले. व्यापारी कर्जांची रक्कम वाढूनही त्यांचे एकूण कर्जांशी प्रमाण थोडे उतरले. आर्थिक संस्था व शेती ह्यांना दिलेल्या कर्जांत प्रत्येकी ५ कोटी रु. ची घट झाली; त्यांचे एकूण कर्जांशी प्रमाण घटले ह्यांत नवल नाही. औद्योगिक कर्जांपैकी इंजिनिअरिंगच्या धंद्याने सर्वात जास्त कर्ज उचलले; त्याचा वाटा १२.९%चा १४.५% झाला.

औद्योगिक उत्पादनांतील वाढ आणि किंमत वाढ ह्यांचे मानाने औद्योगिक कर्जांतील वाढ जास्त प्रमाणात झालेली आहे. बाजारातील तंगीला कारखानदारांना तोंड देता यावे ह्यासाठी बँकांचा कर्जपुरवठा मध्यम मुदतीचा, पूर्वीपेक्षा जास्त मुदतीचा, होऊं लागला आहे. मार्च, १९६४ ते मार्च, १९६५ ह्या मुदतीत एकूण कर्जांत १२% ची वाढ होऊनही कर्जखात्यांची संख्या फक्त ७% ने वाढली. ह्याचा अर्थ, प्रत्येक अडवान्स सरासरीने मोठा झाला आहे. औद्योगिक कर्जे एवढी वाढूनही कर्जदारांची संख्या १०% ने घटली आहे. कर्जदार व्यापारीही कर्जे वाढूनसुद्धा संख्येने कमी झाले आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### ५० शास्त्रज्ञांना बडतर्फीच्या नोटीसा

औद्योगिक प्रगती साधण्यासाठी वैज्ञानिकांचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा म्हणून भारत सरकारने विविध क्षेत्रांतील शास्त्रज्ञांची एक यादी तयार केलेली आहे. ह्या यादीत भारतात शिकलेल्या व परदेशाहून शिकून आलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या शास्त्रज्ञांचा समावेश आहे. शास्त्रज्ञांच्या खास ज्ञानाचा उपयोग होईल अशा प्रकारचे काम हुकमी मिळणे कठीण असल्यामुळे असे योग्य काम मिळेपर्यंत त्यांना वाजवी मेहनताना देऊन तात्पुरते काम देण्यात येत असते. ह्या शास्त्रज्ञांनी स्वतःच्या ज्ञानास योग्य अशी नोकरी मिळविण्याची खटपट करावी अशी सरकारची अपेक्षा असते. पण सर्वच शास्त्रज्ञांच्या बाबतीत ही अपेक्षा पुरी होत नाही असे दिसते. शास्त्रज्ञांची यादी करून त्यांची व्यवस्था लावण्याचे काम कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ही संघटना करीत असते. ह्या संघटनेने अलीकडेच ५० शास्त्रज्ञांना बडतर्फीच्या नोटीसा दिल्या आहेत. ते भारतामधील काही शास्त्रीय संघटनांतून काम करीत आहेत. पण त्यांनी स्वतःच्या लायकीप्रमाणे नोकरी शोधण्याचा प्रयत्नच केला नाही असे सरकारचे म्हणणे आहे. यादीतील कित्येक शास्त्रज्ञ त्यांची सध्याची नोकरीच कायम स्वरूपाची आहे असे समजत आहेत असे सरकारचे म्हणणे आहे. १ नोव्हेंबर, १९६५ रोजी यादीत ६४० शास्त्रज्ञांची नावे होती. त्यांपैकी १८ टक्के शास्त्रज्ञ त्यांच्या सध्याच्या नोकरीत दोन वर्षांपेक्षाही अधिक काळ काम करीत आहेत. दोन वर्षांत ज्या शास्त्रज्ञाला बाहेर नोकरी मिळू शकली नाही त्याने तसा प्रयत्नच केला नसावा, अगर बाहेर जाण्याची त्याची इच्छाच नसावी किंवा सध्याच्या नोकरीतील वेतनापेक्षा अधिक मोठा पगार मिळविण्याची त्याची पात्रताच नसावी, असा निष्कर्ष सरकारतर्फे काढण्यात येत आहे. म्हणून दोन वर्षांपेक्षा अधिक काळ सरकारने पुरविलेल्या नोकरीलाच चिकटून राहणाऱ्या शास्त्रज्ञांना नोटीसा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

---

### अमेरिकन मदतीमधून निर्माण झालेला आर्थिक ताण

अमेरिकेने पी. एल्. ४८० कार्यक्रमानुसार भारताला १६५० कोटी रुपये किमतीचा शेतीचा माल आतापर्यंत पुरविलेला आहे. ह्या पैशापैकी बराचसा पैसा भारतामधील विकास कार्यावर खर्च करण्यात येत असतो. तथापि, त्यांपैकी १३ ते १८ टक्के रक्कम अमेरिकेला स्वतःच्या उपयोगासाठी वापरण्याचा हक्क आहे. ह्याशिवाय अमेरिकेने भारताला डॉलर्समध्ये दिलेल्या मदतीचे रूपांतरही रुपयांत करण्यात आलेले आहे. ह्या पैशातून अमेरिकेच्या उपयोगासाठी एक खास खाते उघडण्यात आले असून त्यामधील पैसा हिंदमधील अमेरिकन वकिलात अगर इतर संघटना मनाप्रमाणे वापरू शकतात. खात्यात आतापर्यंत ७७ कोटी डॉलर्स जमा करण्यात आले असून त्यांपैकी १८ कोटी डॉलर्स अमेरिकन वकिलातीने वापरले आहेत. ह्याचा अर्थ असा की ह्या खात्यात ५९ कोटी डॉलर्स अथवा ३०० कोटी रुपयांची रक्कम अजून शिल्लक असून तिचा वापर करण्याची अमेरिकेला मुभा आहे. गेल्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये अमेरिकन वकिलातीने नेपाळला मदत देण्यासाठी व इतर काही कामासाठी ३० कोटी रुपयांची रक्कम खात्यातून काढली होती. अमेरिकेच्या उपयोगासाठी उघडण्यात आलेल्या ह्या खास खात्यातून मोठाल्या रकमा अशा तऱ्हेने काढण्यात आल्या तर त्याचा परिणाम होऊन भारताच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडतो असे विचार भारताचे माजी अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनी व्यक्त केले आहेत. भारताच्या अर्थव्यवस्थेला चलनवाढीच्या व उत्पादनातील घटीच्या भुंग्याने आधीच पोखरलेले आहे. अशा परिस्थितीत मदत देणाऱ्या देशाने भारतात स्वतःच्या उपयोगासाठी मोठ्या रकमा वापरणे म्हणजे परिस्थिती अधिक बिकट करण्यास हातभार लावण्यासारखेच आहे. म्हणून ह्या खास खात्यातील रक्कम गोठवून इंडिया–अमेरिकन फौंडेशन स्थापन करण्याची सूचना श्री. कृष्णम्माचारी ह्यांनी केली आहे.

---

### प्राचीन ऐतिहासिक स्मारके जतन करणे अवघड

भारताच्या प्राचीन इतिहासाची साक्ष देणारी अनेक वैभवसंपन्न स्मारके देशभर विखुरलेली आहेत. त्यांची डागडुजी व इतर व्यवस्था मध्यवर्ती सरकारच्या पुराणवस्तू खात्यातर्फे करण्यात येत असते. पण, गेल्या काही वर्षांत ह्या प्रेक्षणीय अवशेषांची नासधूस करण्याचे अगर त्यांतील कलाकृतींचे उत्कृष्ट नमुने चोरण्याची लाट उसळलेली आहे. त्यामुळे ह्या स्मारकांचे जतन करणे अवघड होत चालले आहे. स्मारकांची नासधूस करण्याचे प्रकार मध्यभारतात विशेष आढळून येतात. प्राचीन शिल्पांची परदेशांत अनधिकृत निर्यात करून पैसा मिळविण्याचा एक धंदाच उदयास आलेला आहे. ह्या गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी ठिकठिकाणी अधिक पहारेकरी ठेवणे आवश्यक आहे. सध्या त्यांची संख्या ४ हजार आहे. पण नीट रक्षण करण्यासाठी निदान १० हजार पहारेकऱ्यांची आवश्यकता आहे. ह्या कामी पैसा अपुरा पडत आहे.

---

### छोट्या सहकारी संघटनांची तक्रार

गुजरातमधील तालुका अगर त्याखालील पातळीवरील छोट्या सहकारी संस्थांनी गुजरात सरकारला असे सुचविले आहे की, मध्यवर्ती सहकारी मार्केटिंग सोसायटीने आपल्याला लागणारा माल खाजगी व्यापाऱ्यांकडून न घेता छोट्या सहकारी सोसायट्यांकडून घ्यावा. ह्याबाबत मध्यवर्ती संघटनेला सक्ती करावी अशी मागणी करण्यात आली आहे. गुजरातच्या मध्यवर्ती सहकारी मार्केटिंग सोसायटीने शेंगदाण्याच्या तेलाचे १० ते १२ लाख डबे सौराष्ट्रामधील खाजगी व्यापाऱ्यांकडून खरेदी केले आहेत. छोट्या सहकारी संघटनांना आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे कठीण जाते. मध्यवर्ती संघटनेने आपली खरेदी त्यांच्याकडून केल्यास लहान संघटनांच्या बऱ्याचशा अडचणी दूर होण्यासारख्या आहेत. मध्यवर्ती संघटनेने तेल गुजरातबाहेर पाठविल्यास तिला दर डब्यामागे २० रुपये नफा होईल असे सांगण्यात येत आहे.

---


## Fergusson College, Poona-4.

The College will reopen on the 20th June 1966. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examination are declared.

T. G. Mainkar
Principal

Poona
25th May 1966.

## आर्थिक मदत देण्यात स्पर्धा

अरबस्तानातील येमेन ह्या राज्याला आर्थिक साह्य देण्याच्या कामी चीन व रशिया ह्यांची स्पर्धा चाललेली आहे. अमेरिकेकडून होणारी मदत हळूहळू कमी होत चालली आहे आणि ब्रिटन येमेनला लागून असलेल्या एडनमधून माघार घेण्याच्या विचारात आहे. रशियाने येमेनच्या राजधानीजवळ १५० रोग्यांची सोय असणारे एक आधुनिक इस्पितळ बांधून दिले आहे, तर शहराच्या उत्तरेकडील तटबंदीच्या पलीकडे चीन एक कापड गिरणी उभारण्याचे काम करीत आहे. ही गिरणी सुरू झाल्यावर तीत १,५०० येमेनी कामगारांना रोजगार मिळेल. कारखान्याच्या उभारणीचे काम गुप्तपणे करण्यात येते. तेथील चिनी कामगार व तज्ज्ञ पाहुण्यांपासून दूर पळतात आणि छायाचित्रे घेऊ देत नाहीत. परंतु गवती कुरणावर उभारण्यात येत असलेल्या ह्या गिरणीचे धुराडे लपू शकत नाही.

## खत कारखान्यासाठी इटालीची मदत

दुर्गापूर आणि कोचीन येथे उभारण्यात यावयाच्या खताच्या कारखान्यांना ३ कोटी डॉलर्सचे कर्ज देण्याचे इटालियन सरकारने मान्य केले आहे. ह्या दोन्ही कारखान्यांना लागणाऱ्या परदेशीय चलनाच्या खर्चातील तीनचतुर्थांश खर्च वरील कर्जातून भागविता येईल. दोन्ही कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागातील असून त्यांचा परदेशीय चलनातील उरलेला खर्च भागविण्यासाठी सरकारला १ कोटी डॉलर्सची सोय करावी लागेल. दुर्गापूर व कोचीन येथील कारखान्यांसाठी अमेरिकेकडून मदत मिळण्याची शक्यता फारशी दिसत नसल्याने त्यांची उभारणी स्वतःच्याच बळावर करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील खत प्रकल्पांना अमेरिकन सरकार मदत देऊ शकणार नाही असे आता स्पष्ट करण्यात आले आहे.

## शेतीमधील उत्पादनवाढीचा इंडेक्स नंबर

( १९५२/५३–१९५६/५७=१०० )

| देश | १९५६-५७ | १९५७-५८ | १९५८-५९ | १९५९-६० | १९६०-६१ | १९६१-६२ | १९६२-६३ | १९६३-६४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारत | १०६ | १०५ | १०९ | ११५ | ११९ | १२० | ११९ | १२१ |
| पाकिस्तान | १०३ | १०१ | १०१ | १०८ | ११३ | ११३ | ११२ | १२० |
| मलाया | ११५ | ११३ | ११० | १२७ | १४३ | १५२ | १५६ | १६७ |
| जपान | ११० | ११३ | ११८ | ११८ | १२० | १२१ | १३२ | १२५ |
| यु. अ. रि. | ११३ | ११५ | ११३ | ११९ | १२४ | ११७ | १३८ | १४६ |
| इस्राएल | १२१ | १२९ | १४६ | १६४ | १५७ | १७९ | २०८ | २१८ |
| टर्की | १०७ | १०९ | १२६ | १२६ | १३१ | १२३ | १२९ | १४२ |
| ब्राझील | ११२ | ११५ | १२२ | १२७ | १३२ | १३५ | १४१ | १४० |
| ऑस्ट्रेलिया | ९९ | ९५ | १२० | १०४ | १०४ | १२७ | १३८ | १४२ |
| न्यूझीलंड | १०३ | १०९ | ११३ | ११५ | ११८ | १०२ | १२३ | ११६ |

**डॉक्टरांना परत आणण्याचे प्रयत्न**— भारतात चांगल्या लायक डॉक्टरांची फार टंचाई आहे. ती अंशतः तरी दूर व्हावी म्हणून भारत सरकार परदेशात काम करीत असलेल्या तज्ज्ञ डॉक्टर्सना देशात परत आणण्याची जोराची खटपट करणार आहे. ब्रिटन, कॅनडा, अमेरिका व ऑस्ट्रेलियात शेकडो हिंदी डॉक्टर्स नोकरी अगर व्यवसाय करीत आहेत.

**म्हैसूर राज्यातील मंद प्रगती**—म्हैसूर राज्यातील कारखानदारांची एक अधिकृत पाहणी १९५९–१९६२ च्या दरम्यान करण्यात आली. पाहणीत गोळा करण्यात आलेल्या माहितीवरून असे आढळून आले की, म्हैसूर राज्यातील मंद औद्योगिक प्रगतीचे कारण स्थानिक पुढारीपणाचा अभाव हे आहे.


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय्.

स्थापना : १९१८ ] [ टेलिफोन नं. ५४९६०

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे १.

जी. सी. डी., डी. कॉम., जी. डी. सी. अॅन्ड ए., सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए., भारत सरकारच्या कंपनी सेक्रेटरी परीक्षा, पुणे विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स, बी. कॉम. व स्पेशल बी. कॉम. डिग्री कोर्स, शॉर्टहँड, इंग्रजी–मराठी टाईपरायटिंग आणि इन्स्टिटयूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

**२ जुलै, १९६६ पासून संस्थेच्या नवीन अद्ययावत इमारतीत वर्ग सुरू होतील.**

— खास वैशिष्टये —

★ सकाळ–दुपार–संध्याकाळचे वर्ग.

★ इंग्रजी–मराठीतून अध्यापनाची सोय.


★ उद्योगधंद्यात पडू इच्छिणाऱ्यांकरिता सुयशदायी असे व्यापारी अभ्यासक्रम.

★ बँकेत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करू इच्छिणाऱ्यांसाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

★ बी. कॉम. एक्स्टर्नल डिग्रीच्या चारी वर्षांच्या सर्व विषयांच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.

माहितीपत्रक २५ पैसे.

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले " विजय " नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४. येथे प्रसिद्ध केले